दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०१४/२०१७-१८
दि.०८/०२/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.क्रिष्णा सी. गुप्ता, ................अपिलार्थी
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.)
भाईंदर (प.) ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
सहा.आयुक्त (सा.प्र.)

## -: विवेचन :-

श्री.क्रिष्णा सी. गुप्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (सा.प्र.) यांचेकडे दि.३०/१०/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

i. मिरा भाईंदर महानगरपालिका को ऑनलाईन आर.टी.आई. (Online RTI) के दायरे मे करने के लिए आपले कार्यालय किंवा राज्य सरकार द्वारा कोई ऑर्डर, अध्यादेश या कार्यालयीन आदेश/ नोटीस जारी की हो, तो कृपया उन सभी पत्रों को प्रमाणित प्रतिलिपिया प्रदान करे।

ii. मिरा भाईंदर महानगरपालिका मे ऑनलाईन आर.टी.आई की सुविधा हेतू आये हुए आवेदन/ शिकायत पत्रों की प्रमाणित प्रतिलिपिया प्रदान करे। for eg. (online email, Aaple Sarkar Portal, Official Complaints, etc.)

iii. सामान्य लोगों के किये गये सभी आवेदनों की प्रती दे, जिसने भी ऑनलाईन (RTI) किये जाने के लिये आपके विभाग मे किसी भी माध्यम से शिकायत आवेदन किया हो।

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत कोणत्याही स्वरुपातील माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थी यांनी दि.०२/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त (सा.प्र.) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (सा.प्र.) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०८/०२/२०१८ रोजी दुपारी ०१.०५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.सा.प्र./२१३/२०१८ दि.०३/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (सा.प्र.) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.३०/१०/२०१७ रोजीच्या पत्रानुसार मला माहिती दिलेली नाही.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

१) जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (सा.प्र.) यांनी अपिलार्थी अर्जदारास मुद्देनिहाय माहिती १० दिवसांत विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी. तसेच यापुढील माहिती अधिकारांतर्गत प्राप्त अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी. वरिल निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.क्रिष्णा सी. गुप्ता,
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.)

२) जन माहिती अधिकारी तथा
सहा.आयुक्त (सा.प्र.)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.) यांचे कार्यालय.